# क्रांती गीत

कितीही दडपूनि टाका आणिक विझवा हा अंगार
सळसळते हे रक्त क्रांतीचे उसळुनि वर येणार ॥

रक्त जाहल्या दाही दिशा या आग पेटली नभी
ती पेटती मशाल घेऊन क्रांती देवता उभी
याच ज्योतिने ज्योत पेटूनि होईल स्वाहाकार ॥

गरुड झेप ही घेऊनि पुढती जाणे क्षितीजावरी
स्वतंत्रतेचे ब्रीद आमुचे तेच ध्येय सामोरी
रक्त आमुचे स्वातंत्र्याचा करिते जय जय कार ॥

नाग विषारी विषमतेचा टाकू निर्दाळुनि
समानता नि स्वातंत्र्याची आज गाऊ या गाणी
क्रांतीची ही आग प्राशूनि आम्ही आग होणार ॥

